# सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती

दै. लोकजन वृत्तसेवा

**पवनी :-** क्लिक हिल फाउनडेशनच्या सुरु असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमा अंतर्गत पवनी येथील वैनगंगा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.



या कार्यक्रमात जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा येथील संगणकशास्त्र विभागाचे विद्यार्थी मंथन वाकडीकर आणि प्रणय खेताडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. मोबाईलचा वापर करत असतांना इंटरनेट व सायबर सुरक्षेबाबत जागरुक राहणे गरजेचे आहे. तसेच ऑनलाईन फसवणूक, पासवर्ड सुरक्षा, सोशल मिडियाचा जबाबदारीने वापर अशा विविध विषयांवर त्यांनी माहिती दिली.

या प्रसंगी वैनगंगा विद्यालयाचे शिक्षक मनजित सिंग आणि मुख्याध्यापिका प्रिया चांदेवार यांनी क्लिक हिल फाउनडेशनचे आभार मानत विद्यार्थ्यांसाठी असे मार्गदर्शन उपयुक्त असल्याचे सांगितले. या प्रसंगी क्लिक हिल फाऊंडेशनचे नागेश तलारी व संगानकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर, अनुपमा काटकर व अजय शिरखे उपस्थित होते.